महत्वाचे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका.
पिंपरी,पुणे१८.मध्यवर्ती भांडार विभाग,
क्रमांक-मभां/८/कावि/१२४/२०१६
दिं- २९/२/२०१६.

विषय- गणवेश देय कर्मचा-यांकरिता खरेदी करणेत आलेले साहित्य व मनपाचे नेहरुनगर कोठारात उपलब्ध असलेले साहित्या ताब्यात घेणेबाबत.

परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिका गणवेश देय नियमावली नुसार नियमीत वेतनश्रेणीत काम करणा-या गणवेश देय कर्मचा-यांना गणवेश कापड/महिला कर्मचारी गणवेश/पावसाळी साहित्य(रेनकोट,रेनसुट व गमबुट) इ. साहित्य मध्यवर्ती भांडार विभागाकडुन खरेदीची कार्यवाही करणेत आलेली आहे. मनपाचे संबधीत विभागाना ऑनलाईन चलनाव्दारे साहित्याची मागणी करुन घेणेकामी यापर्वी कळविणेत आलेले आहे. तथापि अदयापर्यंत काही विभागांनी साहित्य मागणी करुन ताब्यात घेतलेले नसल्याने माझ्या निर्दशनास आले आहे.

तरी या परिपत्रकान्वये पुन:श्च कळविणेत येत की ज्या विभागांनी गणवेश देय कर्मचा-यांना गणवेश कापड/महिला कर्मचारी गणवेश/पावसाळी साहित्य (रेनकोट,रेनसुट व गमबुट) इ. साहित्याची मागणी केलेली नाही. अशा सर्व विभागांनी तातडीने दि.१५/३/२०१६ पर्यंत ऑनलाईन चलनाव्दारे साहित्याची मागणी करुन ताब्यात घेणेची कार्यवाही करणेत यावी. अन्यथा सदर साहित्य आपणांस आवश्यकता नाही असे समजेणेत येईल. संबधीत गणवेश देय कर्मचा-यांना गणवेश देय नियमावली नुसार साहित्य न मिळालेस व विभागातील कर्मचा-यांनी गणवेश परिधान न केलेस असे निदर्शनास आलेस संबधितांना जबाबदार धरणेत येईल. कृपया याची नोंद घ्यावी. याकामी विलंब अपेक्षीत नाही.

सही/-
सह आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११०१८.

प्रति,
सर्व शाखाप्रमुख/विभागप्रमुख
---------------------------------

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर